# भू मि का

# * भूमिका *

आनंद यादवांच्या कथेतील सामाजिकता 'मातीखालची माती' व 'उखडलेली झाडे' या दोन कथासंग्रहाच्या आधारे.

ही दोन पुस्तक संशोधनासाठी घेण्याचा उद्देश एवढाच की, त्या कथेतील माणसे सारख्याच दर्जाची, त्यांची कष्ट करून जगण्याची पध्दतीही सारखीच, समस्या सारख्याच, दारिद्रयही जवळ-जवळ सारखेच. त्यामुळे हे दोन कथासंग्रह मी निवडले आणि ते मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

"मातीखालची माती" हे 1965 सालचे पुस्तक आणि "उखडलेली झाडे" हे 1986 चे पुस्तक आहे. 1965 सालच्या पुस्तकापासून यादव कथाकार म्हणून महाराष्ट्राला परिचित झाले आणि येतील तशी त्यांनी आपल्या आसपासची माणसे, घरातील माणसे, शेजारपाजारची माणसे, त्या व्यक्तिरेखा कथेच्या रूपाने रेखाटल्या. त्यातूनच त्यांच्या लेखनीत पुढे-पुढे ती सरकेल तसतशी प्रगल्भता जाणवली. म्हणून मी माझ्या कुवतीप्रमाणे या दोन्ही पुस्तकातील कथांचा आणि व्यक्तींचा अभ्यास करता-करता लेखकाच्या विकासाचाही आलेख पहाण्याचा प्रयत्न केला आहे.

* * * * *